साठवणीतील गाणी

# आवाजाचा अवलिया
# किशोर कुमार




## सुहास किर्लोस्कर

राजहंस प्रकाशन

विविध भारतीने किशोर कुमारच्या गाण्यांवर बंदी घातली
त्या काळातही किशोरची लोकप्रिय आणि
अनवट गाणी ज्यावर ऐकू शकलो,
त्या रेडियो सिलोनच्या रम्य स्मृतीला...

## आठवणीतील गाणी, मनात साठवणीसाठी...

हिंदी चित्रपटसंगीतातली चार लखलखती नक्षत्रे

**आवाजाचा अवलिया - किशोर कुमार**

**नवरसांचा जादूगार - मोहम्मद रफी**

**चिरतरुण स्वर - आशा भोसले**

**सुरांची सम्राज्ञी - लता मंगेशकर**

यातला प्रत्येक क्यूआर कोड तुम्हाला देईल
पंचवीस अप्रतिम गाण्यांचा नजराणा..!

# अनुक्रम


- ये वही गीत है, जिस को मैंने, धड़कन में बसाया है / ९
- अवलिया, अष्टपैलू कलाकार / ११

१. पायलवाली देखना / ३९

२. तेरे मेरे मिलन की ये रैना / ४२

३. मंज़िलें अपनी जगह हैं / ४५

४. पांच रुपैय्या, बारा आना / ४८

५. ये रातें ये मौसम / ५२

६. एक चतुर नार / ५५

७. ओ हँसिनी / ५९

८. वो शाम कुछ अजीब थी / ६२

९. शोखियों में घोला जाये, फूलों का शबाब / ६५

१०. इस मोड़ से जाते हैं / ६८

११. ज़िंदगी के सफ़र में... / ७१

१२. आँखों में तुम / ७४

१३. मेरा जीवन कोरा कागज़ / ७७

१४. आ चल के तुझे मैं ले के चलूं / ८०

१५. जो राह चुनी तूने / ८३

१६. आदमी जो कहता है / ८६

१७. सारा प्यार तुम्हारा / ८९

१८. सिमटी सी शरमाई सी / ९२

१९. गीत गाता हूँ मैं / ९४

२०. खिलते हैं गुल यहाँ / ९७

२१. छू कर मेरे मन को / ९९
२२. कश्ती का खामोश सफ़र / १०२
२३. कोई होता जिस को अपना / १०५
२४. तुम बिन जाऊ कहाँ / १०८
२५. सवेरे का सूरज तुम्हारे लिये है / १११

---

**आपली आवड**

प्रिय वाचक,

या २५ गाण्यांची निवड लेखकांनी केलीय. ते चित्रसंगीताचे ख्यातनाम जाणकार आहेत. त्यांची निवड छानच आहे. पण तुमच्या आवडीची काही गाणी वेगळीही असू शकतील. 'या पुस्तकात ही गाणी हवीच होती!' असंही तुम्हाला वाटेल. तर वाचकांनी यातल्या कुठल्याही गाण्यांऐवजी स्वत:च्या आवडीची तीन गाणी निवडावीत, आणि तीच का निवडली हे आम्हाला २०० शब्दांत लिहून खाली दिलेल्या ई-मेलवर पाठवावं. तीन सर्वोत्तम लेखांना 'ग्रंथवेध'मध्ये प्रसिद्धी आणि राजहंसतर्फे ग्रंथभेट देण्यात येईल.

ई-मेल : rajhansgranthvedh@gmail.com

---

# ये वही गीत है,
# जिस को मैंने, धड़कन में बसाया है

किशोरनं स्वत:च्या आवाजात गायलेल्या गाण्यांपैकी हे एक गाणं (नक्श लायलपुरी – जयदेव), त्यानं एका गायकाच्या भूमिकेतून पेश केलं आहे. किशोरच्या आवाजातील वैविध्याबद्दल, त्याच्या गायकीबद्दल, वेगवेगळ्या पिढीतल्या संगीतकारांबरोबर बदलत्या काळातल्या संगीतशैलीला किशोरनं कसं आपलंसं केलं, याची अनेक उदाहरणं देताना बरंच सविस्तर लिहिता येईल; पण किशोरच्या चाळीस वर्षांच्या कारकिर्दीमधील २६६१ हिंदी गाण्यांपैकी २५ गाणी निवडणं, हे सगळ्यात मुश्कील. परिचित-अपरिचित, सोलो-युगलगीतं; वेगवेगळ्या चित्रपटांतील प्रसंगानुसार भावदर्शनाच्या वेगवेगळ्या छटा; वेगवेगळे गीतकार-संगीतकार; १००पेक्षा अधिक अभिनेत्यांसाठी केलेलं पार्श्वगायन; भजनापासून जॅझ-डिस्कोपर्यंत वेगवेगळे संगीतप्रकार यांपैकी नेमका कोणताही मापदंड २५ गाणी निवडण्यासाठी अपुराच आहे. आशा-लता-रफी-किशोर या गायक-गायकांची, सी. रामचंद्र-शंकर जयकिशन-सचिन देव बर्मन-राहुल देव बर्मनपासून बप्पी लाहिरीपर्यंत संगीतकारांची २५ गाणी निवडणं ही कामगिरी कोणासाठीही सगळ्यात अवघड आहे.

किशोर कुमारचा परिचय करून देण्याच्या विस्तीर्ण लेखामध्ये किशोरचे विविध पैलू, त्याची आवाज लावण्याची पद्धत, यॉडलिंग अशा विषयांच्या अनुषंगानं ज्या गाण्यांचा उल्लेख केला आहे, त्यांची पुनरावृत्ती करण्याचं २५ गाणी निवडताना टाळलं आहे. त्यानंतर किशोर कुमारनं विविध संगीतकारांची अनेक गाणी गायली, त्यांचं वर्गीकरण केलं. कोणत्याही एका संगीतकाराचं एकच गाणं निवडणं, म्हणजे 'अभिमन्यू, चक्रव्यूह में फस गया है तू' अशी अवस्था. त्यांमधील १८ संगीतकार निवडले आणि गीतकारांचं वैविध्य जपण्याचा प्रयत्न

करताना १६ गीतकारांचा समावेश झाला.

'चलते चलते मेरे ये गीत याद रखना', 'आप के अनुरोध पे मैं ये गीत सुनाता हूँ' अशी गाणी संगीतकारांनी विचारपूर्वक तयार केली, जेणेकरून या गाण्यांच्या निमित्तानं त्या संगीतकारांचं गाणं अजरामर होईल. परंतु त्या गाण्यांचा अंतिम २५ गाण्यांमध्ये समावेश करण्याचं टाळलं. किशोरनं १००पेक्षा अधिक अभिनेत्यांसाठी पार्श्वगायन केलं, त्यांपैकी किशोरव्यतिरिक्त १७ अभिनेत्यांची गाणी समाविष्ट केली जातील, याची खबरदारी घेतली. गाण्यांचा रसास्वाद घेताना बरेच वेळा अनवट, माहीत नसलेल्या, दुर्मीळ समजल्या जाणाऱ्या गाण्यांचा समावेश करण्याचं प्रकर्षानं टाळलं ...तर सांगायचा मुद्दा हाच की किशोर या अवलिया कलाकाराची २५ गाणी काढण्याचा प्रयास केला आहे, त्याचा उद्देश काही गाण्यांचं रसास्वादाच्या अनुषंगानं विश्लेषण करणं, एवढाच आहे. किशोरच्या प्रत्येक चाहत्याला ही कामगिरी सोपवली, तर प्रत्येकाची २५ गाणी वेगळी असू शकतील. 'आनेवाला पल जानेवाला है' हे गाणं तोंडपाठ असूनही गुलजार यांच्या शब्दांकडे दुर्लक्ष झाल्याचं एकदा माझ्या लक्षात आलं आणि त्या गाण्याचा अर्थ उमजल्यावर गाण्याचा आनंद शतपटीनं वाढला. ५ वर्षांपूर्वी अशी यादी करताना मी वेगळा विचार केला असता, अजून ५ वर्षांनी अशीच यादी करताना काही गाणी कमी-जास्त करून वेगळ्याच २५ गाण्यांचं विश्लेषण केलं जाईल. त्यामुळे हा आज केलेला गुलदस्ता आहे. याचा दरवळ कदाचित तुम्हाला तुमच्या आवडत्या गाण्यांचं रसग्रहण करण्यास, ती गाणी वेगळ्या दृष्टीनं ऐकण्यास उद्युक्त करेल.

नक्श लायलपुरी यांच्या शब्दांत सांगायचं झालं तर...

मैंने ये गीत जब गुनगुनाया,
सज गई है खयालों की महफ़िल
प्यार के रंग आँखों में छाये,
मुस्कुराई उजालों की महफ़िल
ये वो नग़मा है जो ज़िंदगी में, रोशनी बनके आया है
तेरे होंठों से इस को चुराकर, होंठों पे सजाया है
ये वही गीत है, ये वही गीत है

**सुहास किर्लोस्कर**

♫

# अवलिया, अष्टपैलू कलाकार

संगीताची आवड असणारे सगळेच गाणी गुणगुणत असतात. आवडती गाणी तोंडपाठ करावी लागत नाहीत, ती आपसूक लक्षात राहतात. किशोर कुमारच्या गाण्यांची खास बात हीच आहे, की आजही ती गाणी गुणगुणली जातात. बालक-पालकांपासून आजोबांपर्यंत कोणालाही गाणं गायला लावणारा किशोर कुमार सर्वांनाच जवळचा वाटतो, याचं कारण ती गाणी साधी-सोपी वाटतात. ओठांवर रुळलेली गाणी आपण सगळेच मनातल्यामनात गुणगुणत असतो. फार वरच्या स्केलमधली गाणी सर्वसाधारणपणे गुणगुणली जात नाहीत. किशोर कुमारनं हा विचार त्याच्या गाण्यांत केलेला दिसतो. 'छूकर मेरे मन को, किया तूने क्या इशारा' हे गाणं मासला देण्यासारखं आहे. 'दिल को छूकर' अशा अर्थाचे भाव या गाण्यात असल्यामुळे किशोर कुमारनं खालच्या स्केलमध्ये गायलं आहे, अगदी कानात गोष्ट सांगितल्यासारखं. त्यामुळे राजेश रोशन यांनी रवींद्रसंगीताला वेगळा आयाम दिलेलं हे गाणं प्रत्येकाला गावंसं वाटतं. पण एकदा स्वत: गुणगुणलेलं गाणं रेकॉर्ड करून ऐकल्यावर बऱ्याच जणांच्या लक्षात येतं, की काहीतरी चुकतं आहे. सूर, अभिनय, अनेक हरकती, नायकाच्या लकबी, नायकाच्याच आवाजात गायलं आहे असं वाटावं इतकं साधर्म्य; हे सर्व कुठून आणणार? आज सर्वांत जास्त रिपीट व्हॅल्यू किशोरच्या गाण्यांना आहे. अशी काय खास बात आहे किशोर कुमारच्या गायनात?

**चल शुरू हो जा...**

१९४५ साली बॉम्बे टॉकीजच्या चित्रपटात सरस्वती देवी यांच्या संगीतदिग्दर्शनामध्ये कोरसमध्ये गाणी गायल्यानंतर 'बांका सिपैय्या घर जाये

हो' ('आठ दिन' - १९४६ - सचिन देव बर्मन) या गाण्यात काही ओळी गाण्यापासून किशोर कुमारच्या करियरची सुरुवात झाली. 'जिद्दी' (१९४८) चित्रपटात 'मरने की दुवाएँ क्या मांगू' या गाण्यापासून 'वक्त की आवाज' (१९८८) चित्रपटासाठी 'ए गुरु आ जाओ' या गाण्यापर्यंत ४० वर्षांत २६६१ हिंदी, १७१ बंगाली, गुजराथी, भोजपुरी, मराठी, ओरिया, आसामी, कन्नड, पंजाबी आणि इंग्रजी अशी २९०५ गाणी आभासकुमार गांगुली उर्फ किशोर कुमारनं गायली. १६ चित्रपटांचं संगीतदिग्दर्शन, २४ गाण्यांचा गीतकार, १०२ चित्रपटांत अभिनय, १४ चित्रपटांची निर्मिती, १२ चित्रपटांचं दिग्दर्शन, १५ चित्रपटांचं कथालेखन, ५ चित्रपटांचं पटकथालेखन अशा व्यक्तिमत्त्वाला अष्टपैलू हा शब्द कमीच पडतो.

एकदा या बहुपैलू कलाकाराची मुलाखत लता मंगेशकर यांनी घेतली. त्या वेळी लतानं विचारलं, 'गायन, अभिनय, संगीतदिग्दर्शन, निर्मिती यांमध्ये सगळ्यात जास्त काय आवडतं; कारण आम्ही मंगेशकर कुटुंबीय किशोर कुमार या अवलिया कलाकाराला भारतातला 'डॅनी के' मानतो, जो असाच अष्टपैलू कलाकार होता.' त्या प्रश्नाला किशोरनं उत्तर दिलं, की लहानपणापासून त्याला गायनाचीच आवड होती आणि तेव्हापासून तो कुंदनलाल सैगल यांना आपला गुरू मानायचा. खरं तर किशोर कुमारला अभिनय करण्याची इच्छा नव्हती. चित्रपटसृष्टीत प्रवेश करण्यासाठी आधी अभिनय करून मिळतील ती कामं घ्यावीत आणि कालांतरानं गायकाचं करियर करावं, असा सल्ला ज्येष्ठ बंधू अशोक कुमार यांनी किशोरला दिला. नाइलाजास्तव संघर्षाचा एक भाग म्हणून, एक तडजोड या स्वरूपात किशोर कुमारनं मिळतील ती कामं करण्यास सुरुवात केली.

खेमचंद प्रकाश यांनी प्रोत्साहन देऊन किशोरकडून काही गाणी गाऊन घेतली. 'जिद्दी' चित्रपटात 'मरने की दुवाएँ क्यों मांगू' हे गाणं किशोर कुमारनं गुरू के. एल. सैगलच्या आवाजात गायलं. त्या काळी कुंदनलाल सैगलच्या स्टाईलनं गाणी गाण्याची प्रथा होती, त्यामुळे मोहम्मद रफी, मुकेश यांच्या पहिल्या काही गाण्यांवर सैगलचा प्रभाव दिसतो. याच 'जिद्दी' चित्रपटात लतानं गायलेलं 'चंदा रे जा रे जा रे, पिया से संदेसा मोरा कहियो जा' गाणं गाजलं होतं. त्याच गाण्याची नक्कल (पॅरडी) किशोरनं 'पडोसन' चित्रपटातील 'एक चतुर नार' गाण्यात केली आहे.

खेमचंद प्रकाशनंतर किशोर कुमारला त्याच्या आवाजात गाण्याचा सल्ला देणारे होते सचिन देव बर्मन, ज्यांना किशोर गुरू मानायचा. किशोर कुमारच्या शब्दांत सांगायचं झालं, तर ''सचिनदाने मुझे संगीत भी दिया और

प्यार भी.'' किशोरला लहानपणापासून दोन गायक आवडायचे, कुंदनलाल सैगल आणि सचिन देव बर्मन. 'रंगीला रंगीला रंगीला रे, रंगीला' हे बंगाली लोकसंगीतामधील गाणं सचिन देव बर्मन यांनी गायलं आहे (खरं तर 'रोंगीला' असं गायलं आहे). ते गाणं किशोर शाळा-कॉलेजमध्ये सचिन देव बर्मनच्या शैलीत गायचा. विशेष म्हणजे १९४६ साली सरस्वतीदेवी यांनी संगीतबद्ध केलेल्या 'रंगीला रंगीला' या गाण्यात कोरसमध्ये गाण्याची संधी मिळाली, ते गाणं बंगाली लोकसंगीतावर आधारित होतं. १९५५ साली रिलीज झालेल्या देवदास चित्रपटाचं संगीतदिग्दर्शन करताना 'आन मिलो, आन मिलो श्याम सावरे' हे गाणं गीता दत्तकडून गाऊन घेतलं, ते त्याच बंगाली लोकसंगीतावर आधारित होतं. सचिन देव बर्मन यांनी लिहिलेलं आणि संगीतदिग्दर्शन केलेलं 'धीरे से जाना बगीयन में' हे गाणंसुद्धा किशोरला आवडायचं, त्यामुळे शाळा-कॉलेजमध्ये किशोर नेहमी गायचा आणि बक्षीसही मिळवायचा. 'चलती का नाम गाडी' या चित्रपटातील 'पाँच रुपैय्या बारा आना' या गाण्यात किशोरनं अनेक गाण्यांची पॅरडी केली आहे, त्यात सचिन देव बर्मन यांच्या या गाण्याची नक्कल बंगाली बाबूप्रमाणे केली आहे. विशेष म्हणजे याचं संगीतदिग्दर्शन सचिन देव बर्मन यांचंच. १९७३ साली रिलीज झालेल्या 'छुपा रुस्तम' या चित्रपटामध्ये किशोरनं सचिन देव बर्मन यांच्याच संगीतदिग्दर्शनात 'धीरे से जाना खटीयन में' असं विडंबन केलं आहे. या गाण्याच्या सुरुवातीला सूर लावण्याचा अभिनय किशोरनं ज्या पद्धतीनं केला आहे, ते लाजवाब आहे. या गाण्याला सचिन देव बर्मन यांनी खोल हे बंगाली तालवाद्य वापरलं आहे, त्यामुळे एकदम बंगाली मूड तयार होतो. हे गाणं किशोरनं देव आनंदच्या नव्हे तर स्वत:च्या आवाजात गायलं आहे. गाण्यामध्ये अंतऱ्यापूर्वी 'वीरान थी अपनी जिंदगी, और सुना था अपना मकान' अशी वाक्यं बोलल्यानंतर किशोर पुन्हा गाण्याच्या मूडमध्ये येतो, ते लाजवाब आहे.

खंडवा, मध्य प्रदेशमध्ये वकिलाच्या घरी जन्म झालेला आभासकुमार जेव्हा किशोर या नावानं मुंबईमध्ये आला, तेव्हा त्याचा मोठा भाऊ अशोक कुमार चित्रपटसृष्टीत स्थिरावला होता. १९३६ साली 'जीवन नैय्या' चित्रपटामधून अशोक कुमार यांनी चित्रपटसृष्टीत पदार्पण केलं, त्या वेळी त्यांची नायिका होती देविका राणी. त्याच वर्षी प्रदर्शित झालेल्या 'अछूत कन्या' चित्रपटाचं जंगी स्वागत झालं आणि अशोक कुमार सर्वतोमुखी झाले. १९४३ सालापर्यंत अशोक कुमार 'बॉम्बे टॉकीज'चा प्रमुख अभिनेता होता. त्या काळी चित्रपट-निर्मिती स्टुडिओमार्फत केली जायची आणि नामांकित कलाकार स्टुडिओला बांधलेले असायचे. 'कंगन', 'बंधन', 'झुला' या चित्रपटांनंतर १९४३ साली रिलीज

झालेल्या 'किस्मत' चित्रपटात अशोक कुमार यांनी पहिला अँटी हिरो साकारला. बॉम्बे टॉकीजच्या 'किस्मत' चित्रपटानं त्या काळी एक कोटी रुपयांचा बिझनेस केला. १९४३ साली अशोक कुमार यांनी शशधर मुखर्जी यांच्याबरोबर 'फिल्मिस्तान स्टुडिओ'ची स्थापना केली. अशोक कुमारनं किशोरला पार्श्वगायक होण्यापेक्षा अभिनय करून मिळेल ते काम स्वीकारण्याचा सल्ला दिला. अर्थात सचिन देव बर्मन यांची ओळख करून देण्याची मागणी अशोक कुमारनं पूर्ण केली.

अशोक कुमारचा भाऊ या नात्यानं किशोरला काही अभिनेत्याचे रोल मिळाले, पण 'बम चिक बम' असली बडबड करणाऱ्याला कोणत्याही निर्मात्यानं गांभीर्यानं घेतलं नाही. अनेक निर्माता-दिग्दर्शकांना किशोरमधला हुन्नर ओळखता आला नाही, त्यामुळे त्याला सुरुवातीची बरीच वर्षं पाणउतारा-अपमान सहन करावा लागला. हे अपमानाचे दिवस किशोरच्या कायम लक्षात राहिले आणि त्यानं लोकप्रिय झाल्यावर त्याची परतफेड केली. निर्माते त्या काळात अनेक कलाकारांचे पैसे बुडवायचे किंवा वेळेत देणं टाळायचे. निर्मात्यांकडून पैसे वसूल करण्यासाठी किशोरनं नानाविध अतरंगी क्लृप्त्या केल्या. कधी अर्धी दाढी करून तो सेटवर शूटिंगला यायचा; तर कधी पळून जाण्याचा सीन साकारायचा असेल तर पळून स्टुडिओबाहेर जायचा, तो पुन्हा यायचाच नाही. तो डायलॉग विसरल्याचं नाटक करायचा, शूटिंगच्या दरम्यान हसणं-खिदळणं सुरूच ठेवायचा, कधी अर्धीच दाढी करून यायचा. यामध्ये दोष निर्मात्यांचा होता, परंतु त्यांनी किशोर कुमारचा स्वभाव विचित्र आहे, अशा कंड्या पिकवल्या. संगीताविषयी विलक्षण आस्था असणाऱ्या किशोरनं चित्रपटसंगीताच्या मागणीनुसार गाण्यामध्ये कधीही कसूर केली नाही. अर्थात किशोरनं पैसे न घेता गाणं गाण्यास नकार दिल्यामुळे त्याची काही गाणी मन्ना डे, मोहम्मद रफी यांनी गायली आहेत, असं मन्नादा यांनी एका मुलाखतीत सांगितलं आहे.

## ज़िंदगी की यही रीत है....

गायक होण्याची आवड असल्यामुळे ते स्वप्न पूर्ण करण्यासाठी किशोर कुमार मुंबईत आला. बंधू अशोक कुमारच्या सल्ल्यानुसार किशोरनं नाखुशीनं चित्रपट स्वीकारला आणि पहिली छोटी भूमिका केली 'कनीज' (१९४९) चित्रपटात, एका अर्धवटरावाची; ज्यामध्ये त्यानं गाणं गायलं, 'बमचिक बमचिक बम बम'. 'मिस मेरी' या चित्रपटाचं शूटिंग करण्यासाठी किशोर एकदा दक्षिणेत गेला होता. त्या वेळी दक्षिणेकडील चित्रपट आताच्या काळाइतक्या शिस्तबद्ध रीतीनं निर्माण केले जात नसायचे. शूटिंग कधी सुरू होणार, याची वाट बघण्यात किशोरला पाच

# १. पायलवाली देखना

लचकत चमकत चलत कामिनी, दधिगुन दमकत चपल दामिनी
ओ बाँवरी ओ साँवरी, अरी ओ चंचल पल-छिन रुक जा रुक जा रुक जा

पायलवाली देखना
यहीं पे कहीं दिल है
पग तले आये ना
पायलवाली देखना ...

जैसे दामनिया बदरा में उड़े
कुछ दूर चले फिर जा के मुड़े
उठा रे नयन कजरारे
पर इतना समझ ले किसी की लगे हाये न
पायलवाली देखना ...

कित झूम चली मदिरा सी पिये
मतवारी पवन अचरा में लिये
ज़माना है यूँ ही मस्ताना
देखो जी कही रुत बिना काली घटा छाये न
पायलवाली देखना ...

कहीं ऐसा न हो कोई बात बने
अंगड़ाई मेरी तेरा नाच बने
नाचो री ना बन के चकोरी
घूँघर कहीं धड़कन मेरी बन जाये न
पायलवाली देखना ...

चित्रपट : एक राज
गीतकार : मजरूह सुलतानपुरी
संगीतकार : चित्रगुप्त

लीला बघाव्यात, असा संभ्रम पडणं साहजिक आहे.

'चलती काम नाम गाडी' या चित्रपटात 'बाबू समझो इशारे', 'रुक जाओ ना जी', 'हाल कैसा है जनाब का', 'हम तुम्हारे है जरा' या गाण्यांइतकंच आणखी एक उत्तम गाणं होतं; परंतु चित्रपटाची लांबी जास्त झाल्यामुळे ते कट करण्यात आलं. 'इन हाथो से सबकी गाडी चल रही है' या गाण्यात किशोरनं दिलीपकुमार, गुज्जू व्यापाऱ्याची नक्कलही केली आहे. चित्रपटाचं दिग्दर्शन नावापुरतं सत्येन बोस यांचं असलं, तरी अनेक प्रसंग किशोर-मधुबाला-अशोक कुमार आणि अनुपकुमार यांनी खुलवले आहेत. सत्येन बोस यांनी ३४ चित्रपटांचं दिग्दर्शन केलं, त्यामधील 'चलती का नाम गाडी' हा चित्रपट सर्वांत जास्त चालला.

♫



*सचिन देव बर्मन यांनी किशोर कुमारला नाना रंगांची गाणी दिली...*

की तऱ्हा उडकर’ हे दाखवताना दिग्दर्शक गुलजार यांचा कॅमेरा खालच्या बाजूनं आकाश दाखवतो आणि त्या पार्श्वभूमीवर सुचित्रा सेन दिसते. ‘शरमाती हुई कोई’ हे ऐकताना आपण बघतो, की सुचित्रा सेन खाली उतरते; कारण शब्द आहेत, ‘कदमों से उतरती है’. ‘तुम तक जो पहुंचती है’ या प्रत्येक वाक्याच्या वेळी ते दोघं जवळ आलेले दिसतात.

‘आंधी’ चित्रपटातील आणखी दोन युगलगीतं, ‘तुम आ गये हो, नूर आ गया है’, ‘तेरे बिना ज़िंदगी से कोई शिकवा तो नहीं’ अशीच आपल्या ओठांवर रुळलेली आहेत. गुलजार, राहुल देव बर्मन आणि किशोर कुमार या तिघांनी अनेक बहारदार गाणी दिली आहेत. ‘फिर वोही रात है’, ‘आप की आंखों में कुछ’ (‘घर’), ‘आनेवाला पल’ (‘गोलमाल’), ‘ओ माझी रे’ (‘खुशबू’), ‘जाने क्या सोच कर नही गुजरा’ (‘किनारा’), ‘राह पे रहते है’ (‘नमकीन’), ‘मुसाफिर हूँ यारों’ (‘परिचय’) ही गाणी अशाच प्रकारे काव्य, संगीत आणि गायकीचा संगम आहेत.

♫




*किशोर कुमार आणि लता मंगेशकर एका जुन्या छायाचित्रात प्रसन्न मूडमध्ये*

टाकून म्हणतो, 'छोड़ो अब क्या कहना है.'

काहीच न बोलता सगळंच तर सांगून झालं, आता व्यक्त होण्यासाठी शब्दांची गरज आहे का?

♫



Kishorekumar

4th. November 1963.

My dear Manik mama,

It's a great pleasure to receive your letter and trunk call. I would deem it a greater pleasure to sing in your film under your direction. Now a days I do not sing for any artiste, but in your case it would be an exception and to justify my statement, I leave the matter entirely to you. Apart from the usual H.M.V. royalty, whatever you fix up is final from my side.

You have asked me to come down to Calcutta, but I am afraid I shall not be able to make myself free in the near future, because I shall be shooting almost every day in this month. Moreover my mother is very sick since she returned from Hardwar about a week back. At present it will not be wise on my part to leave her alone according to doctor's advise.

Under the above circumstances, it would be very convenient for me if you would kindly take the trouble of coming down to Bombay with Monkumashi and stay at my place and record the song any time during 26th. to 30th. of this month. I believe you won't have any difficulty. If you approve of the proposal I shall make all arrangements for recording at a very reasonable rate (Re: musicians and recording) and by any chance if you can not approve of the proposal, I shall really feel sorry, but in any case I shall adjust myself whatever might be the situation.

How are you, Monkumashi, Khokon and others ?

With regards I remain,

yours affly

Kishore

*किशोर कुमार यांनी जागतिक कीर्तीचे चित्रपट निर्माते-दिग्दर्शक सत्यजित राय म्हणजेच आपले आप्त माणिकदा यांना लिहिलेलं एक दुर्मीळ पत्र...*



*राहुल देव बर्मन उर्फ पंचम यांनी त्यांच्या वडिलांप्रमाणेच किशोर कुमारच्या बहुगुणी गळ्याला न्याय दिला.*

राहुल देव बर्मन यांच्या संगीतदिग्दर्शनामध्ये हेच गाणं किशोरनं बंगाली भाषेत गायलं आहे. 'एक दिन पाखी उरे, जाबे रे आकाशे, फिरबे ना से तो आर, कारो आकाशे' या गाण्यात किशोरचा आवाज आणि पंचमनं दिलेली ट्रीटमेंट वेगळीच आहे. एकच गाणं किती वेगवेगळ्या पद्धतीनं गायलं जाऊ शकतं, याचं उत्तम उदाहरण किशोरच्या गाण्यात दिसतं. म्हणूनच 'एक गीत दो आवाज़'मध्ये नेहमीच किशोरची व्हर्शन्स अधिक वेळा ऐकली गेली आहेत, ऐकली जातात.

♫